# महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO 9001:2008) (ISO/IEC 27001:2005)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, चौथा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

दूरध्वनी क्र. (०२२) २६४७१२५५ (का.) फॅक्स क्र. (०२२) २६४७३९८०

Email : director@msbte.com Web : www.msbte.com


जा.क्र.मरातंशिमं/का-५०/शि.प.मान्यता प्रस्ताव/२०१४ / ४३६२ दिनांक - 10 JUL 2014

**Web Circular**

प्रति,
अध्यक्ष / प्राचार्य,
मंडळाशी संलग्न असलेल्या AICTE Approved
विनाअनुदानित अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / HMCT पदविका संस्था

**विषय : संस्थेतील शिक्षकीय पदांवरील नियुक्त्यांना मान्यता घेणेबाबत**

संदर्भ : मंडळाचे परिपत्रक क्र.मरातंशिमं/का-१०/२०१०/६९, दि.१९ मार्च २०१०

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने मंडळाशी संलग्न असलेल्या सर्व AICTE Approved अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र आणि HMCT पदविका संस्थांना कळविण्यात येते की, ज्या संस्थांनी मंडळाच्या संदर्भाधीन पत्रान्वये संस्थेतील शिक्षकीय पदांवरील नियुक्त्यांना मंडळाची मान्यता मिळण्यासाठीचे प्रस्ताव सादर केले असतील त्या संस्थांनी सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करावी :-

१) ज्या संस्थांनी मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.२/एनजीसी/२००१/२३८८, दि.३१/८/२००१ अन्वये दि.३१ मार्च २०१० पर्यंत निवड प्रक्रिया पूर्ण केलेली आहे, अशा संस्थांनी शिक्षकीय पदांवरील नियुक्त्यांना मान्यता मिळण्यासाठीचे प्रस्ताव तंत्रशिक्षण संचालनालयास सादर करावेत.

२) मंडळाच्या संदर्भिय परिपत्रकानुसार दि.१/४/२०१० नंतर मंडळाच्या नियमावलीप्रमाणे निवड प्रक्रिया राबविलेल्या संस्थांनी त्यांचे प्रस्ताव मंडळास सादर करावेत.

३) मंडळाकडे सादर केलेल्या प्रस्तावांमध्ये दि.३१ मार्च २०१० पूर्वीच्या नियुक्त्यांचे प्रस्ताव आणि त्यानंतरचे मंडळाच्या मानकानुसार असलेले प्रस्ताव एकत्रित सादर केले असतील तर असे प्रस्ताव वेगवेगळे करुन अनुक्रमे संचालनालय व मंडळाकडे सादर करावेत.

४) ज्या संस्थांमधील शिक्षकीय पदांवरील नियुक्त्यांना तंत्रशिक्षण संचालनालयाची मान्यता मिळालेली आहे, अशा संस्थांनी त्याच नियुक्त्यांना पुन्हा मंडळाची मान्यता मिळण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याची आवश्यकता नाही.

सर्व संबंधित संस्थांनी मंडळाकडे सादर केलेल्या प्रस्तावांबाबत वरीलप्रमाणे कार्यवाही करावी.

( प्रमोद अं. नाईक )
संचालक,
म.रा.तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

प्रत : १) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीसाठी सादर
२) प्रभारी अधिकारी/उपसचिव, म.रा.तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/ औरंगाबाद/ नागपूर यांना माहितीसाठी रवाना.

*D/Bhadekar / Staff Approval/ Bindu Namavali*